पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
☎ : ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०



● परीक्षा व मूल्यमापन मंडळ ● Board of Examinations and Evaluation ●

जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/
Ref. No. : PAHSU/BOEE/ 1605

दिनांक : 16 JUL 2023
Date :

<u>अत्यंत महत्वाचे व तातडीचे</u>

प्रति,
**मा. प्राचार्य/संचालक/अध्यक्ष/सचिव,**
सर्व संलग्नीत महाविद्यालये, विविध संस्था,
विद्यापीठातील सर्व संकुले.

**विषय :- पदवी परीक्षेच्या अंतिम वर्षाच्या उत्तरपत्रिका तपासणेबाबत..**
**संदर्भ :-** पुअहोसोविसो/पवमूमं/१५९६ दिनांक १५/०७/२०२३

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन मार्च/एप्रिल २०२३ सत्राच्या परीक्षांचे निकाल तातडीने घोषित करणेबाबत महाराष्ट्र शासनाचे सक्त निर्देश विद्यापीठास प्राप्त झाले आहेत. त्यानुषंगाने विद्यापीठाशी निगडीत सर्व घटक युध्दपातळीवर प्रयत्न करीत आहेत. अंतिम वर्षाच्या बऱ्याच उत्तरपत्रिका परिक्षण व परिनिरीक्षणांचे काम राहिले आहे.

त्यानुषंगाने संदर्भीय पत्रान्वये आज रविवार दिनांक १६/०७/२०२३ रोजी आपले महाविद्यालय/ संस्था/ संकुल सुरू ठेवून आपल्या महाविद्यालय / संस्था / संकुलातील सर्व नियमित / कंत्राटी / तासिका तत्वावरील शिक्षकांना सदर परीक्षेचे उत्तरपत्रिकांचे परिक्षण व परिनिरीक्षणांचे काम पूर्ण करणेसाठी मा.कुलगुरु महोदयांनी आवाहन केले होते. परंतू काही प्राचार्य / अध्यक्ष/ संचालक यांच्याकडून परीक्षेच्या कामासाठी योग्य असा प्रतिसाद आज मिळाला नाही. काही महाविद्यालयातील बऱ्याच शिक्षकांनी मूल्यमापनाचे काम आज केलेले दिसून येत नाही. त्यामुळे अपेक्षेप्रमाणे उत्तरपत्रिकांचे मुल्यमापन झाले नाही व त्यामुळे आज पदवीच्या अंतिम परीक्षेचे निकाल घोषित करण्यास विलंब होत आहे. सदरची बाब गंभीर स्वरुपाची आहे.

तरी आपणांस आदेशान्वये कळविण्यात येते की, दिनांक १७/०७/२०२३ रोजी सकाळी ११.०० वा. च्या आत उर्वरित सर्व उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन पूर्ण करणेसाठी आपल्या महाविद्यालयातील सर्व नियमित शिक्षक / तासिका तत्वावरील / कंत्राटी शिक्षक अशा सर्व शिक्षकांना मूल्यमापनाचे काम करणेसाठी आपल्या स्तरावरुन सक्त सुचना देण्यात याव्यात. अन्यथा परीक्षेच्या कामात प्राधान्याने प्रतिसाद न दिल्यास आपण व आपल्या महाविद्यालयातील शिक्षक महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम ४८(४) नुसार कारवाईस पात्र राहतील, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(डॉ. शिवकुमार गणपूर)
**संचालक,**
परीक्षा व मूल्यमापन मंडळ